National Conference

On

# Impact of Globalisation on Political, Socio-Economic and Liberal Democracy in India

*(28th & 29th Sept. 2018)*

Sponsored By

Indian Council of Social Science Research

Originized By

Department of Political Science

Ujwal Gramin Mahavdyalaya, Ghonsi, Tq- Jalkot , Dist.Latur



Editor

Prin. Dr. Sadanand H. Gone

Dr. Dayanand M. Gudewar

ISBN- 978-93-83672-75-2

National Conference
On

# Impact of Globalisation on Political, Socio-Economic and Liberal Democracy in India

(28th & 29th Sept. 2018)

**Sponsored By**
**Indian Council of Social Science Research**

**Originized By**
**Department of Political Science**
Ujwal Gramin Mahavdyalaya, Ghonsi, Tq- Jalkot , Dist.Latur

**Editors**
**Prin. Dr. Sadanand H. Gone**
**Dr. Dayanand M. Gudewar**

Shaurya Publication, Latur

# DECLARATION BY THE PUBLISHER

ISBN- 978-93-83672-75-2

**PUBLISHED AT**
Ujwal Gramin Mahavidalaya, Ghonsi, Tq.-Jalkot. Dist. Latur

**PUBLISHER**
Shaurya Publication,
Kapil Nagar, Khadgaon Road, Latur, Dist. Latur
Vistit- www.rjournals.co.in Email: hitechresearch11@gmail.com

**EDITORS**
Prin. Dr. Sadanand H. Gone
Dr. Dayanand M. Gudewar

**COVER DESIGNING**
**Arun Godam**

**PRINTING**
R.R. Graphics , MIDC, Latur

Views, idea and materials published in this ISBN Book are intellectual properties of author (s). Author(s) is/ are solely responsible for their publication and not the Editors, Principal or publisher.

© All right are reserved. No part of this publication may be reproduced, stored, retrieved or transmitted in any form, by any means, without the written permission from the Principal, **Dr. Sadanand H. Gone** Ujwal Gramin Mahavdyalaya, Ghonsi, Tq- Jalkot , Dist.Latur

**28th September 2018**

**Prin. Dr. Sadanand H. Gone**

 ISBN- 978-93-83672-75-2


| | | |
|---|---|---|
| २७. | जागतिकीकरणाचे सामाजिक चळवळीवरील परिणाम<br>**प्रा. डॉ. शामराव महादेव लेंडवे** | १७८ |
| २८. | जागतिकीकरण आणि उच्च शिक्षण<br>**डॉ. सुनिल विश्वनाथराव शिंदे , संतोष बालासाहेब कोल्हे** | १८२ |
| २९. | जागतिकीकरणाचा नकारात्मक पैलू<br>**प्रा. ज्ञानेश्वर बनसोड, डॉ. महादेव गव्हाणे** | १८६ |
| ३०. | जागतीकीकरण आणि भारताची वाटचाल<br>**डॉ. संतराम प्रभाकर मुंढे** | १९१ |
| ३१. | भारत आणि जागतिकीकरण<br>**प्रा. डॉ. बोरोळे रजनी अनंतराव** | १९६ |
| ३२. | जागतिकीकरण : ग्रामसंस्कृती व मराठी साहित्य<br>**डॉ. सूर्यवंशी दिपक सुभाषराव** | २०० |
| ३३. | जागतिकीकरणाचा कृषी क्षेत्रावरील परिणाम - एक अभ्यास<br>**प्रा.डॉ.सुखनंदन ढाले** | २०६ |
| ३४. | खाउजा संस्कृती मधील शेतकरी आत्महत्या<br>**प्रा.डॉ.रामदिनेवार गोविंद शंकरराव** | २१८ |
| ३५. | भारतीय समाज आणि जागतिकीकरण<br>**प्रा. डॉ. घायाळ एस. पी.** | २२३ |
| ३६. | जागतिकीकरण आणि उदारमतवादी लोकशाही<br>**प्रा.डॉ. एस.एम. कोनाळे** | २३१ |
| ३७. | जागतिकीकरण आणि रोजगार<br>**डॉ. स्मिता काशिनाथराव मरवाळीकर** | २३६ |
| ३८. | जागतिकीकरण व भारतातील उच्च शिक्षण<br>**प्रा.घटकार आर.व्ही.** | २३९ |
| ३९. | जीएसटी:- एक देश एक कर<br>**प्रा. काळे गोविंद रामराव** | २४४ |
| ४०. | जागतिकीकरणाचे भारतावरील परिणाम<br>**प्रा.कुंभारकर के.जी.** | २४९ |
| ४१. | जागतिकीकरण आणि नवीन आंतरराष्ट्रीय राजकीय व्यवस्था<br>**प्रा. अरूण पेंटावार** | २५३ |

 ISBN- 978-93-83672-75-2

# २९.
# जागतिकीकरणाचा नकारात्मक पैलू

**प्रा. ज्ञानेश्वर बनसोडे**
*पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग, राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर*
**डॉ. महादेव गव्हाणे**
*प्राचार्य, राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर*

---

जागतिकीकरणाच्या त्सुनामी लाटांखाली सगळे जग आज सापडले आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेपासून आज कोणतेही राष्ट्र अलिप्त राहू शकत नाही. इच्छा असो अथवा नसो पण आज प्रत्येक राष्ट्र जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत ओढले गेले आहे. जागतिकीकरणामध्ये मुख्यत: बाजारयंत्रणेचा वापर मोठ्या प्रमाणात करणे व सरकारी हस्तक्षेप व नियंत्रण, मदतीचे प्रमाण कमी करून अंतर्गत व आंतरराष्ट्रीय व्यापारांवरील बंधने कमी करणे, खाजगी क्षेत्रास अधिक वाव देणे यासारख्या घटकांचा अंतर्भाव होतो. भारतात १९९० च्या सुमारास जागतिकीकरणाला सुरूवात झाली. या काळात देशावर विदेशी कर्ज एवढे वाढले होते की, जागतिकी बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी ह्या खाजगी संघटनांनी भारताला आणखी कर्ज देणे नाकारले व कर्ज मिळवण्यासाठी भारतावर कांही अटी लादल्या. या अटींमध्ये भारताने आपल्या अर्थव्यवस्थेमध्ये कांही धोरणात्मक बदल केले. अर्थव्यवस्थेतील या बदलांना आर्थिक सुधारणा असे म्हटले जाते.

जागतिकीकरण हा शब्द पहिल्यांदा १९६० साली वापरण्यात आला. जागतिकीकरणाला इंग्रजीत Globalization असे म्हटले जाते. Glob या शब्दापासून Globalization शब्द तयार झाला आहे. जागतिकीकरणाचा निश्चित अर्थ स्पष्ट करणे अवघड आहे. पण सर्वसाधारणपणे जागतिकीकरण ही उत्पादने, सेवा, भांडवल, लोक, माहिती आणि संस्कृती यांच्या सीमापार वाढत्या प्रवाहाला दर्शवणारी संकल्पना आहे. मुक्त व्यापार आणि मुक्त बाजारपेठांच्या माध्यमातून वैश्विक एकीकरण साधणारी प्रक्रिया आहे.

**जागतिकीकरणाच्या व्याख्या -**

**१) एडवर्ड हार्मन :**

"जागतिकीकरण ही सीमापार उत्पादने, भांडवल, सेवा आणि आर्थिक क्रिया-प्रक्रियांच्या वाढत्या प्रवाहाला लक्ष्य करणारी प्रक्रिया आहे."

२) हेरॉड, टायेल आणि रॉबर्ट्स :

"जागतिकीकरण ही आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेचे एका काल्पनिक विश्व अर्थव्यवस्थेकडे होणारे संक्रमण दर्शवणारी संकल्पना आहे."

३) स्मिथ :

"जागतिकीकरण ही आंतरराष्ट्रीयवाद आणि सर्वांसाठी स्वातंत्र्य या मूल्यांचा समावेश असणारी आणि मुक्त व्यापार आणि अर्थव्यवस्थेचे फायदे सर्वांना मिळवून देणारी सर्वसमावेशक प्रक्रिया आहे."

वरील व्याख्येवरून जागतिकीकरणाची कांही वैशिष्ट्ये स्पष्ट होतात -

- जागतिकीकरणात मुक्त व्यापाराचा पुरस्कार असतो.
- जागतिकीकरण ही आंतरराष्ट्रीय पातळीवर क्रिया-प्रतिक्रिया वाढविणारी प्रक्रिया आहे.
- जागतिकीकरणात संपूर्ण जगाची एकच बाजारपेठ निर्माण केली जाते.
- जागतिकीकरणात सरकारची नियंत्रणे नसतात.
- जागतिकीकरणात सरकारी उपक्रमांचे खाजगीकरण केले जाते.

**जागतिकीकरणाचे नकारात्मक परिणाम :**

**१) लोकशाही विरोधी व्यवस्था -**

लोकशाही संकल्पना ही स्वातंत्र्य, समता आणि न्यायाच्या मुल्यावर आधारित आहे. पण जागतिकीकरणाची प्रक्रिया ही या लोकशाही मुल्यांचे उल्लंघन करणारी प्रक्रिया आहे. जागतिकीकरणामुळे एकीकडे संपत्ती वाढत आहे तर दुसरीकडे बेकारी वाढत आहे. जगातील गरीब देश आणि श्रीमंत देश यांच्यातील दरी वाढत आहे. भारतात श्रीमंत अधिक श्रीमंत होत आहेत आणि गरिब अधिक गरीब होत आहेत. त्यांच्यात दोन ध्रुवाचे अंतर निर्माण होत आहे.

**२) कामगार वर्गाचे शोषण -**

जागतिकीकरणाची प्रक्रिया ही गरीब कामगार वर्गाचे शोषण करणारी प्रक्रिया आहे. उत्पादन क्षेत्रात जागतिकीकरणामुळे झालेले सर्व बदल कामगार वर्गाच्या दृष्टीने अत्यंत घातक सिद्ध झाले आहेत. सुधारणेच्या नावाखाली काम व कामगार यांच्यावरचे व्यवस्थापनाचे नियंत्रण कमालीचे वाढले आहे. कामगारांची उत्पादनक्षमता वाढवून उत्पादन खर्च कमी करणे याशिवाय दुसरा कोणताच हेतु त्यामागे नसतो. लहान-लहान युनिटमध्ये उत्पादनप्रक्रिया विभागून कंत्राटी कामगारांकडून कामे करून घेतली म्हणजे कायद्याने कामगारांना द्यावयाच्या कोणत्याच

 ISBN- 978-93-83672-75-2

सोयीसुविधा देण्याची जबाबदारी उद्योजकावर राहत नाही. बारा-बारा तास कामगारांना काम करायला लावले जाते आणि कामगारकपातीचाही मार्ग मोकळा होतो. कामाचे मर्यादीत तास, कामाची हमी, कायदेशीर संरक्षण, सुरक्षेचे उपाय या सर्व गोष्टींना कामगारवर्ग पोरखा झाला आहे. नव्या आर्थिक धोरणांमुळे सार्वजनिक क्षेत्रातील कामगार बेकार होत आहेत. अनेक लहान उद्योग व कारखाने बंद पडून कामगारांवर बेकारीची कु-हाड कोसळली आहे.

**३) असमतोल विकास -**

जागतिकीकरणामुळे विकासाचा असमतोल निर्माण झाला आहे. जागतिकीकरणातील उत्पादन पद्धतीने लाभान्वित होणारे कोण आहेत आणि त्यांचे प्रमाण जगाच्या एकूण लोकसंख्येत किती आहे. एवढे जरी लक्षात घेतले तरी जागतिकीकरणातून होणा-या विकासाचे स्वरूप स्पष्ट होऊ शकते. जागतिकीकरणात मानवकेंद्री विकासाचा लवलेशही नाही. १९९६ च्या मानव विकास अहवालात म्हटल्याप्रमाणे, रोजगारसंधीमध्ये भर न घालणारा (जॉबलेस), लोकशाहीच्या व सक्षमीकरणाच्या शक्यता संपवणारा (व्हाईसलेस), सांस्कृतिक पाळेमुळे व वेगळेपण स्पष्ट करणारा (रुटलेस), पुढच्या पिढ्यांच्या पदरात निराशा टाकणारा (फ्युचरलेस) आणि श्रीमंतांना अधिक श्रीमंत व गरिबांना अधिक गरिब करणारा (रूथलेस) विकास असे या विकासाचे खरे स्वरुप आहे. ज्या आर्थिक एकात्मिकरणाचे गोडवे आज जागतिकीकरणामुळे गायले जातात. पण ख-या अर्थाने आज बेरोजगारी, विस्थापन, जनसमूहांचे व राष्ट्रांचे विघटन, पर्यावरणाचे असंतुलन अशी एक ना अनेक संकटे उभी राहिली आहेत. कोट्यावधी सामान्य माणसांच्या जीवनावश्यक गरजा भागवणा-या वस्तुंचे उत्पादन पुर्णपणे दुर्लक्षीत झाले आहे. चैनीच्या वस्तुंसाठी फक्त वीस टक्के मध्यमवर्गीयांची बाजारपेठ काबीज करण्यावर आणि त्यासाठी आक्रमक जाहीरातबाजीचे तंत्र अमानुषपणे राबवण्यावरच उत्पादकांच्या सर्व शक्ती केंद्रीत होताना दिसतात.

**४) शहरी व ग्रामीण यांच्यातील वाढती दरी -**

जागतिकीकरण या प्रक्रियेमुळे आपण आज जागतिक खेड्यात राहात आहोत. 'ग्लोबल व्हिलेज' ही संकल्पना जागतिकीकरणातून पुढे आली आहे. महात्मा गांधींनाही खेड्यांचा विकास अभिप्रेत होता. म्हणून 'खेड्याकडे चला' अशी त्यांची हाक होती. जागतिकीकरणामुळे संपुर्ण जग एक खेडे झाले आहे. आपणही त्याच जागतिक खेड्यात राहतो. हे वाच्यार्थाने खरे नसले तरी लाक्षणिकार्थाने खरे आहे. पण वास्तव हे आहे की, नागरी जीवन आणि ग्रामीण जीवन यांच्यामध्ये विकासाच्या दृष्टीने फार मोठी दरी निर्माण झाली आहे. एका बाजूला भव्य मॉल, चार पदरी द्रुतगती रस्ते आणि मोठ-मोठे उड्डाणपूल उभे राहत असतानाच दुस-या बाजूला कंगाल होणारी पिण्याच्या

 ISBN- 978-93-83672-75-2

जागतिकीकरणाचा मोठा प्रवास राहिला आहे. ग्रामीण जीवनाचा कायापालट करण्याचे स्वप्न जागतिकीकरणाने दाखवले होते. परंतु विकास होण्याऐवजी अधोगतीचाच इतिहास मोठा झाला आहे. या सर्व पार्श्वभूमीवर जागतिकीकरणाचे परत मुल्यांकन झाले पाहिजे आणि जागतिकीकरणास अधिक मानवकेंद्री बनवावे लागेल, असे वाटते.

**संदर्भ सूची :**


१) उत्तम कांबळे (संपा.), जागतिकीकरणाची अरिष्टे, कॉ. गोविंद पानसरे अमृत महोत्सव समिती, कोल्हापूर, २०१०

२) गजानन खातू, जागतिकीकरणाचं दाहक वास्तव, अक्षर प्रकाशन, मुंबई, २००४

३) प्रा. जगन करडे, जागतिकीकरण भारतासमोरील आव्हाने, डायमंड पब्लिकेशन, पुणे, २०१३

४) इंगळे दादासाहेब, जागतिकीकरण भारतापुढील आव्हाने, धमदिना प्रकाशन, पुणे, २००१

५) गजानन खातू, जागतिकीकरण परिणाम आणि पर्याय, अक्षर प्रकाशन, कोल्हापूर, २००१

६) डॉ. शैलेंद्र देवळाणकर, आंतरराष्ट्रीय संबंध, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद, २०१०

७) देसाई दत्ता, जागतिकीकरणाच्या जमान्यात शाश्वत विकास, प्रबोधन प्रकाशन ज्योती (मासिक), कोल्हापूर, २००२.